लोकमत



सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या अभियानासाठी बी. जे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची क्लब ऑफिसर म्हणून निवड.

# बाळासाहेब जाधव महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची क्लब ऑफिसरपदी निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी पेंढार :** बाळासाहेब जाधव महाविद्यालयातील बीसीए व बीएस्सी (संगणक शास्त्र) विभागातील चार विद्यार्थ्यांची क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने राबविण्यात आलेल्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अभियानासाठी क्लब ऑफिसरपदी निवड करण्यात आली.

क्लब ऑफिसर म्हणून साक्षी नेहेरकर, मोहिनी जगताप, ऋतू नेहरकर, शोएब शेख आदी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सदर विद्यार्थ्यांचे ट्रेनिंग व ओरिएंटेशन विमान नगर पुणे येथील क्विक हिल कंपनीच्या ऑफिसमध्ये घेण्यात आले, या ट्रेनिंग सेशन दरम्यान विद्यार्थ्यांना अजय शिर्के, गायत्री केसकर यांनी मार्गदर्शन केले. क्वीक हिलच्या चेअर पर्सन अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. निवड झालेले विद्यार्थी पुढील काही दिवसांसाठी क्विक हिल फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या प्रकल्पासाठी सायबर सिक्युरिटी अवेअरनेस बद्दल विद्यार्थ्यांना व सामाजिक घटकांना मार्गदर्शन करून त्यांच्यात जागरूकता निर्माण करण्याचे काम करणार आहेत.

> यावेळी अभियान सक्षमपणे राबविण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

## विद्यार्थ्यांचे अभिनंदन

विभागप्रमुख प्रा नूतन जोशी यांची या अभियानासाठी शिक्षक समन्वयक म्हणून निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अजयनाना कुऱ्हाडे, बाळासाहेब जाधव, उपाध्यक्ष सौरभ डोके, मानद सचिव अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे, संचालक किशोर कुऱ्हाडे, भाऊ कुऱ्हाडे, बबन सहाणे, उल्हास सहाणे, बाबू कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ, जीवन शिंदे, दिनेश सहाणे, कैलास शेळके, प्रदीप गुंजाळ, देविदास पाडेकर, सम्राट कुऱ्हाडे, रमेश कुऱ्हाडे, शांताराम कुऱ्हाडे व सर्व संचालक मंडळ यांनी शुभेच्छा दिल्या.